मशीद बंदर विनयभंगप्रकरणी आरोपी अटकेत

मुंबई : मशीद बंदर रेल्वे स्थानकातील पादचारी पुलावर अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याप्रकरणी 'सीएसएमटी' रेल्वे पोलिसांनी आरोपीला अटक केली. सीसीटीव्ही आणि तांत्रिक तपासाच्या आधारे पोलिसांनी मुसाफिरखाना परिसरातून संशयिताला ताब्यात घेतले. राकेश गौड (३४) असे अटक आरोपीचे नाव आहे.

सोमवारी सकाळी पीडित विद्यार्थिनी शाळेतून परीक्षा देऊन घरी परतत असताना, मशिद बंदर स्थानकात हा प्रकार घडला होता. गर्दीचा फायदा घेऊन एका अनोळखी व्यक्तीने तिचा विनयभंग केला. त्यानंतर आरोपीने तिच्या घरापर्यंत पाठलाग केल्याचे तक्रारीत म्हटले आहे. या प्रकरणी सीएसएमटी रेल्वे पोलीस ठाण्यातच गुन्हा नोंद झाला होता. वरिष्ठ पोलीस निरीक्षक संभाजी कटारे यांनी गुन्हे प्रकटीकरण पथकाला तपासाच्या सूचना दिल्या. त्यानुसार पोलिसांनी मुसाफिरखाना परिसरात सापळा रचून आरोपीला ताब्यात घेतले.

निष्पक्ष चौकशीसाठी बाह्यसमितीचा आग्रह

साहिल वाकोडे मृत्यू प्रकरण; विविध संघटनांचे 'आयआयटी मुंबई'बाहेर आंदोलन

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : साहिल वाकोडे मृत्यूप्रकरणी चौकशीच्या प्रक्रियेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित करत निष्पक्ष चौकशीसाठी संस्थेबाहेरील व्यक्तींची स्वतंत्र समिती नेमावी, प्रा. सूर्यनारायण दुल्ला यांना निलंबित करावे, अशा मागण्यांसह विविध सामाजिक आणि विद्यार्थी संघटनांनी बुधवारी 'आयआयटी मुंबई'च्या प्रवेशद्वारावर 'चलो आयआयटी' आंदोलन केले. या वेळी पोलिसांनी आंदोलकांची धरपकड करून काहींना स्थानबद्ध केले. दरम्यान, आंदोलनकर्त्यांनी 'आयआयटी मुंबई'चे संचालक प्रा. शिरीष केदारे यांची भेट घेऊन विविध मागण्यांचे निवेदन सादर केले.

साहिल वाकोडे मृत्यूप्रकरणाच्या चौकशीदरम्यान संस्था प्रशासनाची विधाने, परीक्षेतील कथित गैरप्रकाराबाबतची भूमिका आणि संबंधित प्राध्यापकांवरील कारवाईचा मुद्दा यांवरून वाद निर्माण झाला आहे. विद्यार्थ्यांनी संस्थेने केलेल्या चौकशीवर आक्षेप घेत स्वतंत्र बाह्यसमितीमार्फत निष्पक्ष तपास करण्याची मागणी केली आहे. साहिलच्या परीक्षेतील कथित गैरप्रकाराबाबत प्रसारमाध्यमांमध्ये माहिती प्रसारित करताना पुरेशी चौकशी झाली नव्हती, असा आरोप केला जात आहे. संस्थेने यापूर्वी दिलेल्या निवेदनाबद्दल पालकांची माफी मागावी, तसेच प्रकरणाशी संबंधित माहितीची गळती रोखण्यासाठी कारवाई करावी, अशी मागणी आंदोलकांनी केली.

आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर 'आयआयटी मुंबई'च्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ बुधवारी पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. या वेळी खासगी सुरक्षारक्षकही तैनात होते.

विविध संघटनांचा आंदोलनात सहभाग

आंदोलनात 'दलित पँथर'चे सहसंस्थापक व्ही. पवार, 'वंचित बहुजन आघाडी'चे सुजात आंबेडकर, काँग्रेसच्या वर्षा गायकवाड, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार)चे अनिश गवांदे आणि प्रीतिक नांदगावकर, लोकशाहीर संभाजी भगत, 'ऑल इंडिया स्टुडंट्स असोसिएशन'चे राहुल सोनपिंपळे, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे (खरात) सुशील निर्भवणे, 'भीम आर्मी'चे अशोक कांबळे, दलित लेखिका उर्मिला पवार, दलित कार्यकर्त्या अशालता कांबळे यांच्यासह आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते सहभागी झाले होते.



विद्यार्थ्यांना संरक्षण देण्याची मागणी

प्रा. दुल्ला यांच्यावरील आरोपांची निष्पक्ष चौकशी पूर्ण होईपर्यंत त्यांना निलंबित करावे, अशी आंदोलकांची प्रमुख मागणी आहे. विद्यार्थ्यांना केवळ आपले मत मांडल्याबद्दल शिस्तभंगाच्या कारवाईला सामोरे जावे लागू नये, आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर कारवाई करू नये आणि विद्यार्थ्यांच्या तक्रारी ऐकण्यासाठी तातडीने संवाद साधावा, असेही निवेदनात नमूद केले आहे.

भेदभाव टाळण्यासाठी मार्गदर्शक सूचना

विद्यार्थ्यांनी आपल्या सहकारी विद्यार्थ्यांची जात, प्रवेशप्रवर्ग, 'जेईई ॲडव्हान्स्ड'मधील क्रमांक किंवा 'गेट'चे गुण विचारणे अयोग्य आहे. केवळ कुतूहलापोटी विचारलेल्या प्रश्नांतूनही एखाद्या विद्यार्थ्याबद्दल पूर्वग्रह आणि त्याचा मानसिकतेवर विपरीत परिणाम होऊ शकतो, असे स्पष्ट करत 'आयआयटी मुंबई'ने विद्यार्थ्यांसाठी नव्या मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या. मात्र, दर्शन सोळंकीच्या मृत्यूनंतर २०२३ मध्येही संस्थेने अशाच सूचना दिल्या होत्या, असा आरोप करत आंदोलक विद्यार्थ्यांनी या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

चर खणण्याच्या नव्या धोरणावरून सभात्याग

पालिकेचे नुकसान झाल्याचा विरोधकांचा आरोप

लोकसत्ता खास प्रतिनिधी

मुंबई : रस्ते आणि पदपथांवर वारंवार चर खोदण्यावर नियंत्रण आणण्यासाठी पालिकेने 'सर्वसमावेशक चर व चर पुनर्भरण मार्गदर्शक तत्त्वे-२०२६' तयार केली आहेत. मात्र हे नवीन धोरण ठराविक वीज वितरण, गॅस, इंटरनेट पुरवठा करणाऱ्या कंपन्यांच्या फायद्यासाठी असल्याचा आरोप विरोधकांनी स्थायी समितीच्या बैठकीत केला. तसेच नव्या धोरणामुळे पालिकेचे २०० कोटींचे नुकसान होणार असल्याचा आरोप करत समितीच्या बैठकीतून सभात्याग केला. सत्ताधाऱ्यांनी बहुमताच्या जोरावर या धोरणाला बैठकीत मंजुरी दिली.

मुंबईत विविध नागरी सुविधा पुरवण्यासाठी अंतर्गत व बाह्य उपयोगिता सेवा संस्थांकडून (युटिलिटी कंपनी) रस्त्यावर चर खोदले जातात. विद्युत वाहिन्या, इंटरनेट जोडणी, गॅस जोडणी यासाठी रस्ते खोदले जातात. सध्या या कामांसाठी २०२३च्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार परवानगी दिली जाते. मात्र या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये बदल करण्यात आले आहे. याबाबतचे सुधारित धोरण पालिका प्रशासनाने स्थायी समितीच्या पटलावर ठेवले. समिती अध्यक्ष प्रभाकर शिंदे यांनी हे धोरण मंजूर केले. त्यामुळे शिवसेना (ठाकरे), काँग्रेस, मनसे, 'एमआयएम'च्या नगरसेवकांनी सभात्याग केला. विरोधकांनी या धोरणाला विरोध केला होता.

कंत्राटदारांमध्ये संगनमत : फणसे

नवीन रस्ता बनला की कंपन्यांना सेवा उपयोगिता वाहिन्या टाकण्याची आठवण होते आणि त्या रस्ता खोदतात. यात नव्या रस्त्याची दुर्दशा होते. त्यामुळे रस्त्याचे कंत्राटदार आणि उपयोगिता वाहिनीचे कंत्राटदार यांच्यात संगनमत असल्याचा आरोप शिवसेना (ठाकरे) पक्षाचे नगरसेवक यशोधर फणसे यांनी केला.

इमारत आगीत दोन महिलांचा मृत्यू

लोकसत्ता प्रतिनिधी

वसई : नालासोपारा-वसई लिंक रोडवरील 'इम्पेरियल हाइट्स' इमारतीच्या १३ व्या मजल्यावरील सदनिकेला आग लागून दोन महिलांचा मृत्यू तर सहा जण जखमी झाल्याची घटना मंगळवारी रात्री १२च्या सुमारास घडली. अग्निशमन दलाच्या जवानांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत अडकलेल्या २५ नागरिकांची सुटका केली. त्यानंतर जखमींना उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले, त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती डॉक्टरांनी दिली.



नालासोपाऱ्यातील 'इम्पेरियल हाइट्स' इमारतीच्या 'बी विंग'मध्ये ६८ कुटुंबे वास्तव्य करतात. मंगळवारी रात्री १३व्या मजल्यावर आग लागली. आगीची तीव्रता वाढल्याने ती ११, १२ आणि १४ व्या मजल्यावरही पसरली. यामुळे अनेक रहिवासी इमारतीत अडकले. ११ व्या मजल्यावर चार जणांनी आपला जीव वाचवण्यासाठी थेट खिडकीतून बाहेर पडून बाल्कनीच्या 'सज्जा'वर आश्रय घेतला. ४० ते ४५ मिनिटांच्या अथक प्रयत्नांनंतर, 'टर्न टेबल लॅडर' वाहनाच्या साहाय्याने अग्निशमन दलाच्या जवानांनी बचावकार्य करत या चौघांची सुखरूप सुटका केली.

दुर्घटनेत अश्विनी पारकर (५०) आणि फाल्गुनी शहा (५०) या दोन महिलांचा मृत्यू झाला आहे. याप्रकरणी आचोळे पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे. या घटनेची सखोल चौकशी सुरू असल्याचे पालिका आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी सांगितले.

उल्हासनगरात एकाची पूर्ववैमनस्यातून हत्या

लोकसत्ता प्रतिनिधी

उल्हासनगर : उल्हासनगर कॅम्प क्र. ४ मधील रेल्वे स्थानकाबाहेर दोन अज्ञात हल्लेखोरांनी पूर्ववैमनस्यातून एकावर गोळीबार करून त्याची हत्या केल्याची घटना बुधवारी रात्री आठच्या सुमारास घडली. हरेश ऊर्फ शांती गजवानी असे मृताचे नाव आहे.

विठ्ठलवाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत ही घटना घडली. हरेश गजवानी हे उल्हासनगर रेल्वे स्थानक परिसरातून पायी जात असताना, दोघा हल्लेखोरांनी त्यांच्यावर पिस्तुलातून दोन ते तीन फेऱ्या झाडल्या. यात गजवानी यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. माहिती मिळताच पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा करत मृतदेह विच्छेदनासाठी रुग्णालयात पाठवला.

मृत गजवानी यांच्यावर यापूर्वी काही गुन्हे दाखल असल्याची माहिती परिमंडळ -४चे पोलीस उपआयुक्त सचिन गोरे यांनी दिली. गजवानी यांच्याच काही जुन्या सहकाऱ्यांनी पूर्ववैमनस्यातून हा जीवघेणा हल्ला केला असावा, असा पोलिसांचा प्राथमिक अंदाज आहे. याप्रकरणी विठ्ठलवाडी पोलिसांनी गुन्हा नोंदवत तीन तपास पथके नेमली आहेत.

औषध कंपन्यांमधील अनियमिततेविरोधात कारवाई

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : राज्यातील औषध उत्पादन आणि विक्री आस्थापनांमधील अनियमितता रोखण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) तपासणी आणि अंमलबजावणी मोहिमेला गती दिली आहे. त्यानुसार एप्रिल ते सप्टेंबर या सहा महिन्यांमध्ये ४,७२३ उत्पादन आणि विक्री आस्थापनांच्या तपासण्या करण्यात आल्या. त्यातील १ हजार ६८१ नोटिसा, तर १ हजार ५८१ परवाने रद्द आणि निलंबित करण्यात आले. त्यात २०.२३ कोटींचा औषधसाठा जप्त करून १५ व्यक्तींना अटक करण्यात आली आहे.

औषधांची गुणवत्ता, उत्पादन प्रक्रिया, साठवणूक, विक्रीची वैधता आणि औषधविषयक नियमांचे पालन यांची पडताळणी करण्यासाठी प्रशासनाकडून नियमित तपासण्या केल्या जातात. त्यानुसार एप्रिल आणि मे या दोन महिन्यांत औषध उत्पादन बनावट, निकृष्ट व विनापरवाना औषधांचा बाजारात शिरकाव होऊ नये यासाठी राज्यभर तपासणी मोहीम अधिक व्यापक करण्यात येईल आणि दोषींविरुद्ध कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात येईल.

- तुकाराम मुंढे, आयुक्त, अन्न व औषध प्रशासन

१२०, तर विक्री आस्थापनांच्या ३४७ तपासण्या करण्यात आल्या. तर जून ते सप्टेंबर या चार महिन्यांत उत्पादन ९६५ आणि विक्री आस्थापनांच्या ३ हजार २९१ तपासण्या करण्यात आल्या. एप्रिल-मे महिन्यांतील कारवायांमध्ये सुमारे १.१२ कोटींचा, तर जून ते सप्टेंबरदरम्यान ११५ कारवायांमधून १९.११ कोटींचा औषधसाठा जप्त करण्यात आला.

डॉ. आंबेडकर स्मारकासाठी प्रस्तावाचे निर्देश

मुंबई : ठाणे जिल्ह्यातील कल्याण तालुक्यातील जांभूळ येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक विकसित करण्यासाठी सामाजिक न्याय विभागाने महिला व बालविकास विभागाकडे जमीन मागणीचा प्रस्ताव सादर करावा, असे निर्देश विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी बुधवारी दिले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९३६ मध्ये जांभूळ येथे जमीन खरेदी केली होती. डॉ. बी. आर. आंबेडकर प्रतिष्ठानने या ठिकाणी स्मारकाची मागणी केली आहे.

राज्यात रेल्वे जाळे, मेट्रो विस्तारासाठी पुढाकार

कृतिगटाची स्थापना; सहा महिन्यांत आराखडा सादर करण्याचे आदेश

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

मुंबई : मुंबई महानगर प्रदेशासह (एमएमआर) राज्यातील प्रमुख भागांमध्ये रेल्वे जाळ्याचा विस्तार, मेट्रो मार्गिका आणि प्रादेशिक जलद परिवहन प्रणाली (आरआरटीएस) विकसित करण्यासाठी सरकारने कृती गटाची स्थापना केली आहे. या वाहतूक व्यवस्थांचा कोणत्या भागात आणि कोणत्या स्वरूपात विस्तार करता येईल, याचा अभ्यास करून सहा महिन्यांत अहवाल सादर करण्याची जबाबदारी या कृतिगटावर सोपविण्यात आली आहे.

'विकसित महाराष्ट्र २०४७' या संकल्पनेच्या अनुषंगाने 'एमएमआर'सह राज्यातील अन्य भागांमध्ये रेल्वेवर आधारित वाहतूक जाळ्याचा नियोजनबद्ध विस्तार करण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. त्यासाठी सर्वसमावेशक आराखडा तयार करण्यात येणार असून, याविषयीचा शासन निर्णय नगरविकास विभागाने जारी केला आहे. या संदर्भात ७ ऑक्टोबर २०२६ रोजी नगरविकास विभागाच्या अपर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय बैठक झाली होती. त्यामध्ये विविध वाहतूक प्रणालींची व्यवहार्यता, उपयुक्तता आणि आर्थिक क्षमता यांचा सखोल अभ्यास करण्याची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली.

कृतिगटात कोणाचा समावेश?

- कृतिगटाच्या अध्यक्षपदी 'एमआरव्हीसी'चे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक असतील. नगरविकास विभाग, महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन, मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आणि सिडकोच्या प्रतिनिधींचा त्यात समावेश आहे.
- याशिवाय पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर आणि नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणांचे प्रतिनिधी तसेच महा मुंबई मेट्रो संचालन महामंडळाच्या प्रतिनिधींनाही निमंत्रित सदस्य म्हणून सहभागी करून घेण्याची तरतूद आहे. 'एमआरव्हीसी'चे मुख्य व्यवस्थापक हे या कृतिगटाचे सदस्य सचिव असतील.

Maharashtra Airport Development Company Ltd.
CIN: U45203MH2002SGC136979

TENDER NOTICE

MADC invites Bids for "Allotment of Advertisement Rights on Leave & License basis at Shri Guru Gobind Singh Ji Airport, Nanded, Maharashtra."

The detailed tender document can be downloaded from the website **www.mahatenders.gov.in** from **15/10/2026, 04:00 PM**

Sd/-
Vice Chairman and Managing Director

Maharashtra Airport Development Company Ltd.
CIN: U45203MH2002SGC136979

SCHEME NOTICE

Request for proposal for Setting up an Industrial ecosystem spanning Aerospace & Defense Components, Aircraft Manufacturing, Assembly and allied manufacturing use on a plot of about 121.229 acres with Airside Taxiway Connectivity outside the SEZ of MIHAN Notified Area.

The detailed Scheme can be seen / downloaded from the website **www.madcindia.org**

Sd/-
Vice Chairman and Managing Director

MAHARASHTRA INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION
(A Government Of Maharashtra Undertaking)
"Udyog Sarthi", MIDC (HQ), Mahakali Caves Road, Marol Industrial Area, Andheri (East), Mumbai-400093.
Tel No.- (022) 4748 5609 email- gmmarketing@midcindia.org

PUBLIC NOTICE

Online applications on **www.recruitment.midcindia.org** are invited for **"Recruitment of 3 Consultants for Technology, AI, Innovation & startups, EODB, IT, Governance & institutional reforms & revival, Infrastructure & Planning & Finance"** as per the qualification and eligibility criteria mentioned on the portal. Candidates must adhere to the detailed terms and condition on the portal. Applicants can apply online on website of MIDC: **www.recruitment.midcindia.org** from **19/10/2026 from 12:00 pm** onwards to **26/10/2026 till 12:00 pm.**

Candidates should note that application will not be accepted in any other format and MIDC has not appointed any agency for the recruitment drive.

Last Date of Submission is 26/10/2026 till 12.00 pm. No application will be accepted post the deadline in any form.

Reliance
Industries Limited
Growth is Life

नोंदणीकृत कार्यालय: ३रा मजला, मेकर चेंबर्स ४, २२२, नरिमन पॉइंट, मुंबई - ४०० ०२१.
दूरध्वनी: ०२२-३५११ ५०००. • फॅक्स: ०२२-२२०४ २२६८. • ई-मेल: investor.relations@ril.com
CIN: L17110MH1973PLC019786

सूचना

छापील स्वरूपातील समभागांचे हस्तांतरण आणि डिमटिरिअलायझेशन (डिमॅट) साठी विशेष खिडकी

कृपया याची नोंद घ्यावी की, सेबीचे परिपत्रक क्रमांक: एचओ/१३/११(२)२०२६-एमआयआरएसडी-पीओडी/आय/३७५०/२०२६ दिनांक ३० जानेवारी, २०२६ **("सेबी परिपत्रक") नुसार, छापील स्वरूपातील समभागांचे हस्तांतरण आणि डिमटिरिअलायझेशन (डिमॅट) यासाठी ४ फेब्रुवारी, २०२७ पर्यंत** एक विशेष खिडकीखुली राहील.

ही सुविधा अशा गुंतवणूकदारांसाठी उपलब्ध आहे ज्यांनी १ एप्रिल, २०१९ पूर्वी **रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड ("कंपनी") यांच्या छापील स्वरूपातील समभागांची खरेदी केली होती,** आणि:

(ए) ज्यांनी हस्तांतरणासाठी समभाग सादर केले नव्हते, किंवा

(बी) हस्तांतरणासाठी समभाग दार केले होते, परंतू दस्तऐवजातील त्रुटींमुळे ते नाकारण्यात आले, परत करण्यात आले, किंवा त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले होते.

विशेष खिडकी यासाठी लागू आहे

१ एप्रिल, २०१९ पूर्वी ज्यांची अंमलबजावणी करण्यात आली होती अशा हस्तांतरण करारासाठी ही खिडकी लागू आहे का याविषयी अधिक स्पष्ट माहितीसाठी, गुंतवणुकदारांनी खालील माहिती पहावी:

१ एप्रिल, २०१९ पूर्वी हस्तांतरणासाठी दाखल केले होते का?	मूळ शेअर प्रमाणपत्र गुंतवणूकदाराकडे उपलब्ध आहे का?	विशेष खिडकीत दाखल करण्यासाठी पात्र आहेत का?
नाही - हे नव्याने दाखल करावेत	होय	होय (सेबीच्या परिपत्रकात नमूद केलेल्या अटींच्या अधीन)
होय, परंतु ते पूर्वी नाकारण्यात आले होते/ परत करण्यात आले होते	होय	
होय, दाखल करण्यात आले होते	नाही	नाही
नाही, दाखल करण्यात आले नव्हते	नाही	नाही

कृपया नोंद घ्यावी की, मूळ शेअर प्रमाणपत्रांसोबत हस्तांतरण करारपत्रे आणि इतर सहाय्यक कागदपत्रे असलेल्या विनंत्यांचाच विशेष खिडकी अंतर्गत विचार केला जाईल.

ज्या गुंतवणूकदारांना विशेष खिडकीचा लाभ घ्यायचा आहे त्यांनी कंपनीचे **रजिस्ट्रार व समभाग हस्तांतरण एजंट, केफिन टेक्नॉलॉजीज लिमिटेड** (युनिट: रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड), यांच्याशी संपर्क साधावा ज्यांचा पत्ता असा आहे: सेलेनियम टॉवर-बी, प्लॉट क्रमांक ३१ व ३२, गचीबोवली, फायनान्शियल डिस्ट्रिक्ट, नानाक्रमगुडा, तैदराबाद ५०० ०३२.

अधिक माहितीसाठी गुंतवणूकदारांनी सेबीचे परिपत्रक पहावे, जे येथे उपलब्ध आहे: **https://tinyurl.com/29ab3727.**

काही चौकशी करायची असल्यास ती येथे पाठवावी: **rilinvestor@kfintech.com**

रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड करिता
स्वाक्षरी/-
सावित्री पारेख
कंपनी सेक्रेटरी आणि कंप्लायन्स ऑफिसर

स्थळ : मुंबई
दिनांक : १५ ऑक्टोबर, २०२६

www.ril.com

ग्लोबल एज्युकेशन लिमिटेड
GLOBAL EDUCATION
Always A Step Ahead

Corporate Identification Number (CIN) : L80301MH2011PLC219291
नोंदणीकृत कार्यालय: ऑफिस क्र. 205, दुसरा मजला, जयशिंग बिझनेस सेंटर प्रिमायसेस CHSL, सहार रोड, पारसीवाडा, अंधेरी (पूर्व), मुंबई - 400099, महाराष्ट्र, भारत
दूरध्वनी: +91 22 49242584 | **ई-मेल:** investorinfo@globaledu.net.in
वेबसाइट: www.globaledu.net.in

दिनांक 24 सप्टेंबर 2026 च्या पोस्टल बॅलेट नोटीसचे शुद्धीपत्रक

ग्लोबल एज्युकेशन लिमिटेड (**"कंपनी"**) तर्फे हे शुद्धीपत्रक दिनांक **24 सप्टेंबर 2026 च्या पोस्टल बॅलेट नोटीसच्या** (**"पोस्टल बॅलेट नोटीस"**) अनुषंगाने जारी करण्यात येत असून, ते सदर पोस्टल बॅलेट नोटीस व त्यास जोडलेल्या स्पष्टीकरणात्मक निवेदनासह वाचावे.

कंपनीच्या इक्विटी शेअर्सच्या रेंडर ऑफर रेट द्वारे **प्रस्तावित बाय-बॅक** साठी विशेष ठरावाद्वारे सदस्यांची मंजुरी घेण्यासाठी पोस्टल बॅलेट नोटीस दिनांक 25 सप्टेंबर 2026 रोजी सदस्यांना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पाठविण्यात आली होती.

स्पष्टीकरणात्मक निवेदनातील काही माहितीची पुनर्तपासणी केल्यानंतर, काही **अनवधानाने झालेल्या लिपिकीय / नोंद त्रुटी** निदर्शनास आल्या आहेत.

सदस्यांनी खालील दुरुस्त्या नोंद घ्याव्यात.

तपशील	पोस्टल बॅलेट नोटीसमध्ये नमूद	सुधारित तपशील
23 सप्टेंबर 2026 रोजी एनएसई वरील बंद बाजारभाव	₹135.44	₹134.45
₹162 बाय-बॅक प्राईस चा वरील बाजारभावावरील प्रीमियम	19.61%	20.49%
मागील 10 ट्रेडिंग दिवसांच्या बंद भावांची साधी सरासरी	₹128.71	₹128.61
₹162 चा वरील 10 दिवसांच्या सरासरीवरील प्रीमियम	25.86%	25.96%
मागील 20 ट्रेडिंग दिवसांच्या बंद भावांची साधी सरासरी	₹121.81	₹121.76
₹162 चा वरील 20 दिवसांच्या सरासरीवरील प्रीमियम	33.00%	33.05%
पोस्टल बॅलेट नोटीसमध्ये नमूद अलीकडील 52 आठवड्यांचा उच्चांक	₹136.97	₹136.97 – बदल नाही
₹162 चा वरील 52 आठवड्यांच्या उच्चांकावरील प्रीमियम	18.27%	18.27% – बदल नाही

मिडासटेक व्हेंचर्स प्रायव्हेट लिमिटेड यांच्या व्यवहारासंबंधी दुरुस्ती

स्पष्टीकरणात्मक निवेदनातील परिच्छेद 9.4(a) मध्ये **मिडासटेक व्हेंचर्स प्रायव्हेट लिमिटेड यांनी दिनांक 24 मार्च 2026 रोजी खरेदी केलेल्या 9,557 इक्विटी शेअर्ससाठी** किमान व कमाल किंमत अनुक्रमे ₹92.30 आणि ₹92.30 प्रति इक्विटी शेअर अशी अनवधानाने नमूद करण्यात आली होती.

मूळ करारनामा आणि व्यवहारनिहाय अंमलबजावणीचा तपशील नुसार योग्य किमती खालीलप्रमाणे आहेत:

किमान व्यवहार किंमत : ₹91.50 प्रति इक्विटी शेअर
कमाल व्यवहार किंमत : ₹92.00 प्रति इक्विटी शेअर

खरेदी केलेल्या इक्विटी शेअर्सची संख्या, व्यवहाराची तारीख, व्यवहाराचे स्वरूप किंवा मिडासटेक व्हेंचर्स प्रायव्हेट लिमिटेड यांच्या भागधारणेमध्ये कोणताही बदल नाही.

बाय-बॅकच्या अटींमध्ये कोणताही बदल नाही

सदस्यांनी विशेषत: नोंद घ्यावी की वरील दुरुस्त्यांमुळे खालील बाबींमध्ये कोणताही बदल होत नाही:

- बाय-बॅक किंमत – ₹162 प्रति इक्विटी शेअर;
- बाय-बॅक साठी प्रस्तावित कमाल 14,75,000 इक्विटी शेअर्स;
- कमाल बाय-बॅक आकार– ₹23,89,50,000, व्यवहार खर्च वगळून;
- निविदा प्रस्ताव मार्ग;
- पोस्टल बॅलेट नोटीसमधील विशेष ठराव; किंवा
- दूरस्थ ई-मतदान कालावधी.

दूरस्थ ई-मतदान चे वैळापत्रक पूर्ववत राहील:

तपशील	तारीख आणि वेळ
मतदानासाठी पात्रता निश्चित करण्याची तारीख	शुक्रवार, 18 सप्टेंबर 2026
दूरस्थ ई-मतदान सुरु होण्याची वेळ	सोमवार, 28 सप्टेंबर 2026 रोजी सकाळी 9:00 वाजता (भारतीय प्रमाणवेळेनुसार)
दूरस्थ ई-मतदान समाप्त होण्याची वेळ	मंगळवार, 27 ऑक्टोबर 2026 रोजी सायंकाळी 5:00 वाजता (भारतीय प्रमाणवेळेनुसार)

हे शुद्धीपत्रक पोस्टल बॅलेट नोटीसचा **अविभाज्य भाग** मानले जाईल आणि पोस्टल बॅलेट नोटीस, त्यास जोडलेले स्पष्टीकरणात्मक निवेदन आणि हे शुद्धीपत्रक एकत्रितपणे वाचावे.

या शुद्धीपत्रकात स्पष्टपणे नमूद केलेल्या बदलाव्यतिरिक्त पोस्टल बॅलेट नोटीसमधील इतर सर्व मजकूर, अटी, खुलासे आणि तपशील **अपरिवर्तित राहतील.**

शुद्धीपत्रक तसेच सदस्यांच्या सोयीसाठी दुरुस्त्या समाविष्ट केलेली सुधारित पोस्टल बॅलेट नोटीस खालील संकेतस्थळांवर उपलब्ध आहे:

कंपनी : www.globaledu.net.in
नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड : www.nseindia.com
सीडीएसएल : www.evotingindia.com

ज्या सदस्यांनी अद्याप मतदान केलेले नाही त्यांनी विशेष ठराव वर मतदान करताना वरील दुरुस्त्यांची नोंद घ्यावी.

ग्लोबल एज्युकेशन लिमिटेड करिता
सही/-
सीएस प्रीती पाचेरीवाला
कंपनी सचिव
ICSI Membership No. FCS 7502

दिनांक : 13 ऑक्टोबर 2026
स्थळ : नागपूर